Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# नाशिक जिल्ह्यातील बदलत्या पिकरचनेचा महिलांच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या परिणामांचे अध्ययन

**प्रभाकर वसंत पगार,** बी. पी. आर्ट्स, एस. एम. ए. सायन्स & के. के. सी. कॉमर्स कॉलेज, चाळीसगाव जि. जळगाव
**डॉ. अजय वासुदेव काटे,** बी. पी. आर्ट्स, एस. एम. ए. सायन्स & के. के. सी. कॉमर्स कॉलेज, चाळीसगाव जि. जळगाव

**सारांश**

नाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण विकासात जिल्ह्यातील बदलत्या पिकरचनेचे योगदान असून त्यामुळे जिल्ह्यातील महिला शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर काय परिणाम झाला, हे जाणण्याच्या हेतूने "नाशिक जिल्ह्यातील बदलत्या पिकरचनेचा महिलांच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या परिणामांचे अध्ययन" करण्यात आले. त्यासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन पद्धती वापरली. दुय्यम माहितीच्या आधाराने नाशिक जिल्ह्यातील महिलांची स्थिति तपासण्यात आली. त्यावरून नाशिक जिल्ह्यात स्त्री-पुरुष प्रमाण , स्त्रियांची साक्षरता याबाबत सकारात्मक बदल दिसून आला. प्राथमिक तथ्यासाठी यादृच्छिक नमूना निवड पद्धतीनुसार नाशिक जिल्ह्यातील 100 महिला शेतकरी निवेदकांकडून माहिती गोळा करून विश्लेषण केले. त्यानुसार नाशिक जिल्ह्यातील पिकरचनेत परिवर्तन झालेले दिसून आले. याशिवाय बदलत्या पिकरचनेमुळे नाशिक जिल्ह्यातील महिला शेतकऱ्यांना प्राप्त होणाऱ्या रोजगार प्रमाणात वाढ झाल्याचे आढळले. याशिवाय पीकरचना बदलल्यामुळे महिलांना उपलब्ध होणाऱ्या भौतिक सुविधामध्ये वाढ झालेली आढळली. अर्थात पिकरचनेत परिवर्तन झाल्याने जिल्ह्यातील महिलांचे राहणीमान सुधारत असल्याचे दिसून आले. एकंदरीत अध्ययनासाठी मानलेली गृहितके सिध्द झालेली आढळतात. संशोधनाच्या शेवटी आवश्यक उपाययोजना देखील सुचविण्यात आलेल्या आहेत.

**महत्वाची नोंद (Key-note)**

बदलती पीकरचना, स्त्री-पुरुष प्रमाण, साक्षरता प्रमाण, रोजगार वाढ, उत्पन्न वाढ, भौतिक सुविधा, कुटुंबांचा आर्थिक स्तर

**प्रस्तावना**

नाशिक हा महाराष्ट्र राज्याचा वायव्येकडील जिल्हा असून जिल्ह्याचा विस्तार 19°36′ उ. ते 20°52′ उ. व 73°16′ पू. ते 74°56′ पू. यादरम्यान आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ 15582 चौ. किमी. असून या जिल्ह्याच्या वायव्येस गुजरात राज्याचे डांग व सुरत जिल्हे आणि उत्तरेस धुळे, ईशान्येस जळगाव, पूर्वेस औरंगाबाद, दक्षिणेस अहमदनगर व पश्चिमेस ठाणे हे महाराष्ट्राचे जिल्हे आहेत. बागलाण, मालेगाव, सुरगाणा, कळवण, पेठ, दिंडोरी, चांदवड, नांदगाव, नासिक, निफाड, येवले, इगतपुरी व सिन्नर हे नासिक जिल्ह्याचे 15 तालुके असून जिल्ह्यात 20 शहरे आणि 1628 वस्तीची आणि 4 ओसाड गावे आहेत.

नाशिक जिल्ह्याचा प्रगतीचा आलेख बघता संशोधक म्हणून आपणास या जिल्ह्यातील ओढ नेहमी लागलेली असते. एकंदरीत जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीसाठी या जिल्ह्यातील बदलत्या पिकरचनेचे योगदान असून त्यामुळे जिल्ह्यातील महिला शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर काय परिणाम झाला, हे जाणण्याच्या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

हेतूने “नाशिक जिल्ह्यातील बदलत्या पिकरचनेचा महिलांच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या परिणामांचे अध्ययन” करण्यात आलेला आहे.

**संशोधनाचे गृहीतके**

1. नाशिक जिल्ह्यातील पिकरचनेत बदल झालेला आहे.
2. नाशिक जिल्ह्यातील बदलत्या पिकरचनेमुळे जिल्ह्यातील महिलांच्या रोजगार निर्मिती वाढली आहे.
3. नाशिक जिल्ह्यातील बदलत्या पिकरचनेमुळे जिल्ह्यातील महिलांना उपलब्ध होणाऱ्या भौतिक सुविधा वाढल्या आहेत.

**संशोधनाचे उदिष्टे**

1. नाशिक जिल्ह्यातील पिकरचनेचा अभ्यास करणे.
2. नाशिक जिल्ह्यातील महिलांना उपलब्ध होणाऱ्या रोजगाराचा अभ्यास करणे.
3. नाशिक जिल्ह्यातील महिलांना उपलब्ध होणाऱ्या भौतिक सुविधाबाबत अध्ययन करणे.

**संशोधन पद्धत**

प्रस्तुत संशोधन प्राथमिक व द्वितीय सामग्रीवर आधारित असून प्राथमिक तथ्य संकलन करण्यासाठी यादृच्छिक नमूना निवड पद्धतीनुसार नाशिक जिल्ह्यातील 100 महिला निवेदकांकडून अनुसूची भरून घेऊन माहिती प्राप्त केली आहे. तसेच द्वितीय सामग्री गोळा करण्यासाठी नाशिक जिल्ह्याचे आर्थिक व सामाजिक समालोचन, त्रै-मासिक, मासिक, इ-पेपर्स, वार्षिक अहवाल, जनगणना अहवाल, संकेत स्थळांचा उपयोग केला आहे.

**संशोधनाचा कालावधी**

सदरील संशोधन हे 2011-12 ते 2020-21 या कालावधीसाठी करण्यात आले आहे.

**स्पष्टीकरण**

नाशिक जिल्ह्यातील नाशिक जिल्ह्यात दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण 2001 च्या जनगणनेप्रमाणे 927 होते, हेच प्रमाण 2011च्या जनगणनेप्रमाणे 934 झाले. ग्रामीण व नागरी भागांकरीता ते अनुक्रमे 945 व 920 आहे. याचाच अर्थ नाशिक जिल्ह्यातील शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात स्त्री-पुरुष प्रमाण अधिक असल्याचे आढळते. तसेच जिल्ह्यातील तालुकानिहाय स्त्री-पुरुष प्रमाण बाबत अधिक माहिती पुढीलप्रमाणे


**आलेख क्र. 1**

**नाशिक जिल्ह्यातील तालुकानिहाय स्त्री-पुरुष प्रमाण दर्शवणारा आलेख**

(1000 पुरुषांमागे स्त्रियांची संख्या)


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I




संदर्भ :तालुका निवडक निर्देशक सन 2022-23 जिल्हा नाशिक पान 01


वरील आलेख क्र.1 मध्ये जनगणना अहवाल 2011 नुसार नाशिक जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण 934 असून आदिवासी सुरगाणा तालुक्यात हे प्रमाण 1001 इतके सर्वाधिक असल्याचे दिसून येते. तर सर्वात कमी प्रमाण नाशिक तालुक्यात केवळ 904 असल्याचे अभ्यासावरून दिसून येते.

**नाशिक जिल्ह्यातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण**

2011 च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या 82.31 टक्के लोक साक्षर होते. राज्याचे हे प्रमाण 82.34 टक्के आहे. ग्रामीण भागात 77.19 टक्के तर नागरी भागात 89.12 टक्के लोक साक्षर आहे.

**आलेख क्र. 2**

**नाशिक जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण दर्शवणारा आलेख** (टक्केवारी)




स्त्रोत: जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, नाशिक जिल्हा- 2021 पान न. 31

वरील आलेख क्र.2मध्ये जनगणना अहवाल 2001 नुसार नाशिक जिल्ह्यातील पुरुष व स्त्रियांच्या साक्षरतेची टककेवारी अनुक्रमे 83.37 प्रतिशत व 64.16 प्रतिशत होती. ती टक्केवारी 2011 मध्ये अनुक्रमे 88.17 व 76.08 प्रतिशत पर्यन्त वाढल्याचे दर्शविले आहे. याचा अर्थ नाशिक जिल्ह्यातील महिला साक्षरतेचे प्रमाण हे वाढत असले तरी हे पुरुष साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा कमी असल्याचे आढळून येते.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**प्राथमिक तथ्याच्या आधारे विश्लेषण**

नाशिक जिल्ह्यात महाराष्ट्र राज्यातील सर्वच भौगोलिक वैशिष्टे आढळतात. विदर्भासारखे कापूस पीक, पश्चिम महाराष्ट्रातील ऊस, डाळिंब पिके, मराठवड्यातील वैशिष्टे पूर्ण पिके, कोकणातील तांदूळ, नागली सारखी पिके, उत्तर महाराष्ट्रातील अन्नधान्ये पिके असे वैशिष्टेपूर्ण पिके नाशिक जिल्ह्यात लागवड होतांना आढळून येत आहेत. या पार्श्वभूमीवर 2011-12 ते 2020-21 या संशोधन कालावधीत नाशिक जिल्ह्यातील महिला शेतकरी वर्गाच्या पिकरचनेत कसा बदल झाला? आणि त्याचा महिला शेतकरी वर्गाच्या आर्थिक स्थितीवर काय परिणाम झाला? हे जाणून घेण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील रहिवाशी असणाऱ्या 100 महिला शेतकऱ्यांची यादृच्छिक नमूना निवडीनुसार माहिती मिळवली. त्याकरिता गृहितकाच्या आधारे अनुसूची तयार करून निवेदकांकडून माहिती गोळा करण्यात आली. प्राप्त माहितीवरून पुढीलप्रमाणे विश्लेषण केलेले आहे.

**महिला शेतकरी वर्गाकडून घेतल्या गेलेल्या पिकांची वर्गवारी**

नाशिक जिल्ह्यातील नागरिक असणाऱ्या '2011-12 ते 2020-21 या कालावधीतील महिला निवेदकांद्वारा घेतल्या गेलेल्या पिकांची वर्गवारी' या घटकाविषयी निवेदकांकडून माहिती घेऊन सदरील सारणी तयार करण्यात आली. त्यानुसार सारणी विश्लेषण पुढीलप्रमाणे

**सारणी क्र. 1**

**2011-12 ते 2020-21 या कालावधीतील स्त्री निवेदकांद्वारा घेतल्या गेलेल्या पिकांची वर्गवारीबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| अ. क्र | तपशील | 2011-12 | | 2020-21 | |
|---|---|---|---|---|---|
| | | वारंवारीता | X/183 * 100 | वारंवारीता | X/187 * 100 |
| अ | तृणधान्ये पिके | 84 | 45.90 | 67 | 35.83 |
| ब | कडधान्ये पिके | 23 | 12.57 | 19 | 10.16 |
| क | भाजीपाला पिके | 34 | 18.58 | 42 | 22.46 |
| ड | गळीत धान्ये पिके | 20 | 10.93 | 16 | 8.56 |
| इ | फळ पिके | 13 | 7.10 | 17 | 9.09 |
| ई | अन्य व्यापारी पिके | 9 | 4.92 | 26 | 13.90 |
| | एकूण | 183 | 100 | 187 | 100 |


(स्त्रोत: प्राथमिक तथ्ये मिलाखत अनुसूचीच्या आधारे)

**आलेख क्र. 3**

**2011-12 ते 2020-21 या कालावधीतील निवेदकांद्वारा घेतल्या गेलेल्या पिकांची वर्गवारीबाबत माहिती दर्शविणारा आलेख**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I




वरील सारणी क्र.1 प्रमाणे 2011-12 मध्ये नाशिक जिल्ह्यातील नागरिक असणाऱ्या निवेदकांपैकी तृणधान्ये पिके घेत असल्याचे मत नोंदविलेल्या निवेदकांची संख्या 84 असून ती संख्या 2020-21 मध्ये 67 पर्यन्त घटलेली आढळते. तर 2011-12 मध्ये नाशिक जिल्ह्यातील कडधान्ये पिके घेत असल्याचे मत नोंदविलेल्या महिला निवेदकांची संख्या 23 होती ती संख्या 2020-21 मध्ये 19 पर्यन्त घटलेली आढळते. तसेच 2011-12 मध्ये नाशिक जिल्ह्यातील भाजीपाला पिके घेत असल्याचे मत नोंदविलेल्या महिला निवेदकांची संख्या 34 असून ती संख्या 2020-21 मध्ये 42 पर्यन्त वाढलेली आढळते. त्याचबरोबर 2011-12 मध्ये नाशिक जिल्ह्यातील गळीत धान्ये पिके घेत असल्याचे मत नोंदविलेल्या महिला निवेदकांची संख्या 20 होती ती संख्या 2020-21 मध्ये 16 पर्यन्त कमी झालेली आढळते. तर 2011-12 मध्ये नाशिक जिल्ह्यातील फळ पिके घेत असल्याचे मत नोंदविलेल्या महिला निवेदकांची संख्या 13 असून ती संख्या 2020-21 मध्ये 17 पर्यन्त वाढलेली आढळते. तर 2011-12 मध्ये नाशिक जिल्ह्यातील कापूस व ऊस यासारखी व्यापारी पिके घेत असल्याचे मत नोंदविलेल्या महिला निवेदकांची संख्या 9 असून ती संख्या 2020-21 मध्ये 26 पर्यन्त वाढलेली आढळते.

याचाच अर्थ नाशिक जिल्ह्यातील महिला निवेदकांकडून प्राप्त माहितीवरून तृणधान्ये, कडधान्ये व गळीत धान्ये पिकाचे प्रमाण कमी होऊन त्याजागी भाजीपाला त्यात विशेषत: कांदा पिके, फळपिके व अन्य व्यापारी पिके यांचे प्रमाण वाढून पीकरचना बदललेली दिसून आली.

**कुटुंबांचा आर्थिक स्तर**

नाशिक जिल्ह्यातील नागरिक असणाऱ्या निवेदकांकडून 2011-12 ते 2020-21 या कालावधीत पिकरचनेत झालेल्या बदलामुळे आपल्या कुटुंबांचा आर्थिक स्तर उंचवलेला आहे का? या घटकविषयी प्रश्न विचारून माहिती करून घेण्याकरिता सदरील सारणीची रचना करण्यात आली.

**सारणी क्र. 02**

**2011-12 ते 2020-21 या कालावधीत पिकरचनेत झालेल्या बदलामुळे आपल्या कुटुंबांचा आर्थिक स्तर उंचवलेला आहे का? याबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| अ. क्र. | तपशील | वारंवारीता |
|---|---|---|
| अ | होय | 67 |


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

| | | |
|---|---|---|
| ब | नाही | 21 |
| क | सांगता येत नाही | 12 |

(स्रोत : प्राथमिक तथ्ये मिलाखत अनुसूचीच्या आधारे)

सारणी क्र.2 नुसार नाशिक जिल्ह्यातील '2011-12 ते 2020-21 या कालावधीत पिकरचनेत झालेल्या बदलामुळे आपल्या कुटुंबांचा आर्थिक स्तर उंचवलेला आहे' असे मत व्यक्त करणाऱ्या महिला निवेदकांचे प्रमाण 67 प्रतिशत असल्याचे दिसते. तर नाशिक जिल्ह्यातील '2011-12 ते 2020-21 या कालावधीत पिकरचनेत झालेल्या बदलामुळे आपल्या कुटुंबांचा आर्थिक स्तर उंचवलेला नाही' असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांचे प्रमाण 21 प्रतिशत असल्याचे आढळले. तसेच नाशिक जिल्ह्यातील नागरिक असणाऱ्या निवेदकांनी '2011-12 ते 2020-21 या कालावधीत पिकरचनेत झालेल्या बदलामुळे आपल्या कुटुंबांचा आर्थिक स्तर उंचवलेला आहे कि नाही याबाबत सांगता येत नाही' असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांचे प्रमाण 12 प्रतिशत असल्याचे निवेदकांकडून प्राप्त माहितीवरून नोंदविण्यात आले.

याचाच अर्थ संशोधन कालावधीत नाशिक जिल्ह्यातील पीकरचना बदलल्यामुळे महिलांचा आर्थिक स्थर उंचावला अशी नोंद करणाऱ्या महिला निवेदकांचे प्रमाण सर्वाधिक आढळते.

**2011-12 ते 2020-21 या कालावधीतील उपलब्ध झालेला रोजगार**

खालील सारणीमध्ये 2011-12 ते 2020-21 या कालावधीतील नाशिक जिल्ह्यातील महिला निवेदकांना शेतात किती मजुरांची आवश्यकता वाटत होती, या घटकाविषयी निवेदकांकडून माहिती घेऊन सदरील सारणी तयार करण्यात आली. त्यानुसार सारणी विश्लेषण पुढीलप्रमाणे

**सारणी क्र. 03**

**2011-12 ते 2020-21 या कालावधीतील महिला निवेदकांना शेतात किती मजुरांची आवश्यकता वाटत होती, याबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| अ. क्र. | तपशील | 2011-12 वारंवारीता | 2020-21 वारंवारीता |
|---|---|---|---|
| अ | 90 श्रम दिवसांपेक्षा कमी | 32 | 17 |
| ब | 90 ते 180 श्रम दिवस | 23 | 20 |
| क | 180 ते 270 श्रम दिवस | 30 | 33 |
| ड | 270 ते 365 श्रम दिवस | 15 | 30 |
| | एकूण | 100 | 100 |


(स्रोत : प्राथमिक तथ्ये मिलाखत अनुसूचीच्या आधारे)

**आलेख क्र. 4**

**2011-12 ते 2020-21 या कालावधीतील निवेदकांना शेतात किती मजुरांची आवश्यकता वाटत होती, याबाबत माहिती दर्शविणारा आलेख**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I




वरील सारणी क्र. 3 नुसार प्रमाणे 2011-12 मध्ये नाशिक जिल्ह्यातील नागरिक असणाऱ्या महिला निवेदकांपैकी ज्या निवेदकांना 90 श्रम दिवसांपेक्षा कमी मजुरांची आवश्यकता असल्याचे मत नोंदविलेल्या निवेदकांची संख्या 32 इतकी असून ती संख्या 2020-21 मध्ये 17 पर्यन्त कमी झाली. तर 2011-12 मध्ये नाशिक जिल्ह्यातील नागरिक असणाऱ्या महिला निवेदकांपैकी ज्या निवेदकांना 90 ते 180 श्रम दिवस मजुरांची आवश्यकता असल्याचे मत नोंदविलेल्या निवेदकांची संख्या 23 इतकी होती, ती संख्या 2020-21 मध्ये 20 पर्यन्त कमी झाली. तसेच 2011-12 मध्ये नाशिक जिल्ह्यातील नागरिक असणाऱ्या महिला निवेदकांपैकी ज्या निवेदकांना 180 ते 270 श्रम दिवस मजुरांची आवश्यकता असल्याचे मत नोंदविलेल्या निवेदकांची संख्या 30 इतकी होती, ती संख्या 2020-21 मध्ये 33 पर्यन्त वाढली. तर 2011-12 मध्ये नाशिक जिल्ह्यातील नागरिक असणाऱ्या महिला निवेदकांपैकी ज्या निवेदकांना 270 ते 365 श्रम दिवस मजुरांची आवश्यकता असल्याचे मत नोंदविलेल्या निवेदकांची संख्या 15 इतकी होती, ती संख्या 2020-21 मध्ये 30 पर्यन्त दुप्पट वाढली.

यावरून अध्ययन कालावधीत मजुरांची आवश्यकता वाढत असल्याचे महिला निवेदकांकडून प्राप्त माहितीवरून दिसून आले.

**उपलब्ध असणाऱ्या भौतिक सुविधांमधील बदलाबाबत माहिती**

खालील सारणीमध्ये नाशिक जिल्ह्यातील 2011-12 ते 2020-21 या कालावधीतील महिलांना उपलब्ध असणाऱ्या भौतिक सुविधांविषयी बदलाची माहिती या घटकाविषयी महिला निवेदकांकडून माहिती घेऊन सदरील सारणी तयार करण्यात आली. त्यानुसार सारणी विश्लेषण पुढीलप्रमाणे

**सारणी क्र.04**

**नाशिक जिल्ह्यातील महिलांना उपलब्ध असणाऱ्या भौतिक सुविधांच्या बदलाची माहिती दर्शविणारी सारणी**

| अ. क्र. | भौतिक सुविधा | 2011-12 | 2020-21 | 2011-12 च्या तुलनेत 2020-21 मध्ये बदल |
|---|---|---|---|---|
| | | **वारंवारीता** | **वारंवारीता** | **वारंवारीता** |
| **अ** | गॅस कनेक्शन | 43 | 89 | 46 |


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

**Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ब | फ्रीज | 24 | 57 | 33 |
| क | मिक्सर | 43 | 70 | 27 |
| ड | टी व्हि | 32 | 88 | 56 |
| इ | टेलिफोन / मोबाईल फोन | 15 | 67 | 52 |
| ई | फॅन | 39 | 83 | 44 |

(स्त्रोत : प्राथमिक तथ्ये मिलाखत अनुसूचीच्या आधारे)

वरील सारणी क्र. 4 नुसार प्रमाणे 2011-12 मध्ये नाशिक जिल्ह्यातील नागरिक असणाऱ्या निवेदकांपैकी गॅस कनेक्शन असणाऱ्या महिला निवेदकांची संख्या 43 इतकी होती, ती संख्या 2020-21 मध्ये 46 ने वाढून 89 पर्यन्त झालेली दिसते. तर उपरोक्त कालावधीत फ्रीज असणाऱ्या महिला निवेदकांची संख्या 24 वरुन 33 पर्यन्त वाढलेली दिसते. तर नाशिक जिल्ह्यातील निवेदकांपैकी मिक्सर असणाऱ्या महिला निवेदकांची संख्या 2011-12 मध्ये 43 इतकी होती, ती संख्या 2020-21 मध्ये 27 ने वाढून 70 पर्यन्त झालेली आढळते. तसेच नाशिक जिल्ह्यातील निवेदकांपैकी टी. व्हि. असणाऱ्या महिला निवेदकांची संख्या 2011-12 मध्ये 32 इतकी होती, ती संख्या 2020-21 मध्ये 56 ने वाढून 88 पर्यन्त झालेली आढळते. नाशिक जिल्ह्यातील निवेदकांपैकी मोबाईल असणाऱ्या महिला निवेदकांची संख्या 2011-12 मध्ये फक्त 15 इतकी होती, ती संख्या 2020-21 मध्ये 52 ने वाढून 67 पर्यन्त झालेली आढळते. तर नाशिक जिल्ह्यातील निवेदकांपैकी फॅन उपलब्ध असणाऱ्या महिला निवेदकांची संख्या 2011-12 मध्ये 39 इतकी होती, ती संख्या 2020-21 मध्ये 44 ने वाढून 83 पर्यन्त झालेली आढळते.

याचाच अर्थ महिला निवेदकांकडून प्राप्त झालेल्या महितीवरुन पिकरचनेत बदल झाल्यामुळे अध्ययन कालावधीत महिलांना उपलब्ध होणाऱ्या भौतिक साधनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

**प्रमुख निष्कर्ष**

1. जनगणना अहवाल 2011 नुसार नाशिक जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण 934 असून आदिवासी सुरगाणा तालुक्यात हे प्रमाण 1001 इतके सर्वाधिक असल्याचे दिसून येते. तर सर्वात कमी प्रमाण नाशिक तालुक्यात केवळ 904 असल्याचे दिसून येते.
2. नाशिक जिल्ह्यातील महिला साक्षरतेचे प्रमाण हे वाढत असले तरी हे पुरुष साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा कमी असल्याचे आढळून येते.
3. नाशिक जिल्ह्यातील 2011-12मध्ये कडधान्ये पिके घेत असल्याचे मत नोंदविलेल्या महिला निवेदकांची संख्या 23 होती ती संख्या 2020-21 मध्ये 19 पर्यन्त घटलेली आढळते.
4. 2011-12मध्ये भाजीपाला पिके घेणाऱ्या महिला निवेदकांची संख्या 34 असून ती संख्या 2020-21 मध्ये 42 पर्यन्त वाढलेली आढळते.
5. 2011-12मध्ये गळीत धान्ये पिके घेणाऱ्या महिला निवेदकांची संख्या 20 असून ती संख्या 2020-21 मध्ये 16 पर्यन्त कमी झालेली आढळते.
6. 2011-12मध्ये फळ पिके घेणाऱ्या महिला निवेदकांची संख्या 13 असून ती संख्या 2020-21 मध्ये 17 पर्यन्त वाढलेली आढळते.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

7. 2011-12 मध्ये नाशिक जिल्ह्यातील कापूस व ऊस यासारखी व्यापारी पिके घेत असल्याचे मत नोंदविलेल्या महिला निवेदकांची संख्या 9 असून ती संख्या 2020-21 मध्ये 26 पर्यन्त वाढलेली आढळते.
8. याचाच अर्थ नाशिक जिल्ह्यातील महिला निवेदकांकडून प्राप्त माहितीवरून तृणधान्ये, कडधान्ये व गळीत धान्ये पिकाचे प्रमाण कमी होऊन त्याजागी भाजीपाला, फळपिके व अन्य व्यापारी पिके यांचे प्रमाण वाढून पीकरचना बदललेली दिसून आली.
9. नाशिक जिल्ह्यातील नागरिक असणाऱ्या महिला निवेदकांपैकी पिकरचनेत झालेल्या बदलामुळे आपल्या कुटुंबांचा आर्थिक स्तर उंचवलेला आहे' असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांचे प्रमाण 67 प्रतिशत असल्याचे निवेदकांकडून नोंदविण्यात आले. हे प्रमाण सर्वाधिक आहे.
10. नाशिक जिल्ह्यातील ज्या महिला निवेदकांना 90 श्रम दिवसांपेक्षा कमी मजुरांची आवश्यकता असल्याचे मत नोंदविलेल्या निवेदकांची संख्या 32 इतकी होती, ती संख्या 2020-21 मध्ये 17 पर्यन्त कमी झाली.
11. ज्या निवेदकांना 270 ते 365 श्रम दिवस मजुरांची आवश्यकता असल्याचे मत नोंदविलेल्या महिला निवेदकांची संख्या 15 इतकी होती ती संख्या 2020-21 मध्ये 30 पर्यन्त दुप्पट वाढली.
12. अध्ययन कालावधीत महिला निवेदकांकडून प्राप्त झालेल्या महितीवरुन पिकरचनेत बदल झाल्यामुळे महिलांना उपलब्ध होणाऱ्या भौतिक साधनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

**गृहीतकांची पडताळणी**

1. **नाशिक जिल्ह्यातील पिकरचनेत बदल झालेला आहे.**

सारणी क्र.1 नुसार नाशिक जिल्ह्यातील महिला निवेदकांकडून प्राप्त माहितीवरून तृणधान्ये, कडधान्ये व गळीत धान्ये पिकाचे प्रमाण कमी होऊन त्याजागी भाजीपाला त्यात विशेषत: कांदा पिके, फळपिके व अन्य व्यापारी पिके यांचे प्रमाण वाढून पीकरचना बदललेली दिसून आली. यावरून सदरील गृहीतक सिद्ध होते.

2. **नाशिक जिल्ह्यातील बदलत्या पिकरचनेमुळे जिल्ह्यातील महिलांच्या रोजगार निर्मिती वाढली आहे.**

सारणी क्र.3 नुसार पीकरचना बदलल्यामुळे रोजगार निर्मितीत वाढ झाल्याचे दिसत असल्याने सदरील गृहीतक सिद्ध होते .

3. **नाशिक जिल्ह्यातील बदलत्या पिकरचनेमुळे जिल्ह्यातील महिलांना उपलब्ध होणाऱ्या भौतिक सुविधा वाढल्या आहेत.**

सारणी क्र. 4 नुसार महिला निवेदकांकडून प्राप्त झालेल्या महितीवरुन पिकरचनेत बदल झाल्यामुळे अध्ययन कालावधीत महिलांना उपलब्ध होणाऱ्या भौतिक साधनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. यावरून सदरील गृहीतक सिद्ध होते

**शिफारशी:**

1. महिला सबलिकरणासाठी शाश्वत कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात.
2. जिल्ह्यातील महिला शेतकरी वर्गाच्या विकासासाठी व्यापारी पीक लागवड कार्यक्रम राबवून शेतीच्या व्यापारिकरणावर अधिक भर द्यावा.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

3. महिलांच्या कृषि रोजगारासोबत बिगर कृषि रोजगार सृजन योजनांवर भर द्यावा.
4. नाशिक जिल्ह्यातील विकास मॉडेल तयार करून उर्वरित महाराष्ट्रात विस्तृतपणे राबवावा.
5. महिला शेतकरी वर्गाने स्वत:च्या विकासाच्या संधि शोधण्यासाठी नवीतम प्रयोग करून शेतीत दीर्घकालीन सुधारणा कराव्यात.

**संदर्भसूची**

1. डॉ. दिलीप ए गाडे, रमेश एच. गावीत : Agricultural Land use and cropping pattern in nashik district (Ms), Aayushi International Interdisciplinary Research Journal, Interdisciplinary International Seminar on Agriculture & Rural Development: Spatial Issues, Challenges & Approaches Organizer: Department of Geography, Shri Sahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur , (ISSN 2349-638x) Impact Factor 4.574,15 डिसेंबर 2018 पान 700 ते 705
2. पाटील दिलीप, महाराष्ट्राच्या कृषि क्षेत्राचा विकास , अर्थसंवाद , मराठी अर्थशास्त्र परिषद त्रै मासिक एप्रिल- जून 2009
3. नाशिक जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन 2011 ते 2023
4. मराठी विश्वकोश
5. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2023, पान.9
6. तालुका निवडक निर्देशक सन 2022-23 जिल्हा नाशिक पान 01
7. जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, नाशिक जिल्हा- 2021 पान न. 31
8. Krishi.icar.gov.in
9. mahades.maharashtra.gov.in


Copyright © | JET Network, All Rights Reserved